भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०३/२०१७

**१) घरातील दाराचा कुलुप तोडुन सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ८/०३/२०१७ रोजी ०१.०० ते ०३.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घरातील समोरचे दाराचा ऑलड्रॉप काढुन दरवाजा उघडुन आत प्रवेश करून घराचे खुटीला अडकवुन ठेवलेल्या पॅन्टच्या खिशातुन नगदी १७,०००/— रू. व झोपेत असलेल्या फिर्यादीच्या मुलीच्या गळयातील सोन्याचा मंगळसुत्र १ तोडा किंमती ३०,०००/—रू. असा एकुन ४७,०००/—रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी शिवकुमार कांतीलाल कटोते वय ४५ वर्ष रा. सितासावंगी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोथनकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ,विनयभंग करून मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**
दिनांक ८/०३/२०१७ रोजी १५.०० ते १८.०० वा. दर. यातील आरोपी क्र. १ हा फिर्यादीला घरी एकटी पाहुन तुला पैसे देतो व अश्लिल शब्दात बोलुन तीचा हाथ पकडुन विनयभंग केला व आरोपी क्र.२ हा आरोपी क्र. १ सोबत फिर्यादीचे घरासमोर जावुन तु आरोपी क्र.१ ची कशी पोलीसा मध्ये रिपोर्ट देतो ते पाहुन घेतो असे बोलुन वाईट शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५४,(अ)(२),२९४,५०४,५०६,३४ भांदवि.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना मुंजमवार पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे धडक मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०७/०३/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ /७७९० मनोहर पडोळे यांचे मोटार सायकल वर मागे बसुन डोकेसरांगी ते किरमटी जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व लापरवाहीने मागेहुन धडक दिल्याने फिर्यादी खाली रोडवर पडल्याने तिच्या उजव्या हाताला मार लागुन जखमी झाल्याने फिर्यादी कृष्णाबाई तेजराम शेंडे वय ४०वर्ष रा दोनाड यांचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७ भादवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना मुंजमकर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे.

**४) गाई म्हशीच्या गोठयाला आग लागल्याने,नुकसान झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ७/०३/२०१७ रोजी २४.०० वा. दर. यातील फिर्यादीचे गाई म्हशीच्या गोठयाला आग लागुन त्यातील २भैस, १गाई, १म्हैस, २वघार, गंभीर स्वंरूपाने जळाल्याने व गोठा पुर्णपणे जळाल्याने ४०,०००/— रू. नुकसान झाल्याने ती आग संशयीत आरोपीने लावली असावी असे फिर्यादी हरिदास सुकाजी घरजारे वय ६० वर्ष रा.वडेगांव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४३५,४२९,४२७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा दिक्षीत पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**५) नौकरीचे आमीष दाखवुन आर्थीक फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/१/२०११ ते १९/०२/२०११ पर्यत यातील आरोपीने फिर्यादीला जिल्हापरिषद शाळेमध्ये चित्रकला शिक्षक म्हणुन नौकरी लावुन देतो असे सांगुन नौकरीचे आमीष दाखवुन फिर्यादी कडुन नगदी ४,००००० /–रू. घेवुन फिर्यादीची आर्थीक फसवणुक केलयाने फिर्यादी कु. देवागंना जागेश्वर चांदेवार वय ३२ वर्ष रा. झेंडाचौक सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४२० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**६) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०८/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. वरठी, पवनी येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभटटी दारु+ सडवा साहीत्य किंमती १३,४५०/–रु. व ०३ लीटर ६०० मीली लीटर देशी दारू किंमती १०००/–रु. असा एकुण किंमती १४,४५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.